# महाराष्ट्र शासन
# नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र. ०२२-२७५६०१४५, विस्तारित क्र. ३२३
इ-मेल-cadredesk.dma3a@gmail.com
Website: https://mahadma.maharashtra.gov.in

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी. बेलापूर, रेल्वे स्टेशन जवळ (पु) नवी मुंबई-४००६१४.

क्र. नपप्रसं/संवर्ग पदोन्नती आदेश/पाणीपुरवठा सेवा /कक्ष-३/२०२५/ ६११६ दि. 14 AUG 2025

महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा गट-क) श्रेणी- ब मधून श्रेणी- अ या संवर्गात आणि श्रेणी-क मधून श्रेणी-ब या संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत.

वाचा:-

१. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र एमसीओ/२०१७/प्र क्र ११९/नवि-१४, दि ११-०५-२०१७
२. महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीचे नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०१५, दि २८-०४-२०१५ व दि १५-०६-२०१७, दि १४-०७-२०२१.
३. विभागीय पदोन्नती समिती बैठक दि १२-०८-२०२५.

## आदेश

महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (गट-क) श्रेणी-ब वेतनश्रेणी S-१४-३८६००-१२२८०० (सहाव्या वेतन आयोगानुसार ९३००-३४८००, ग्रेड वेतन ४३००) मधील खालील नमूद कर्मचाऱ्यांची श्रेणी-अ, वेतनश्रेणी S-१५-४१८००-१३२३०० (सहाव्या वेतन आयोगानुसार ९३००-३४८००, ग्रेड वेतन ४४००) मध्ये आणि महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (गट-क) श्रेणी-क वेतनश्रेणी S-१३-३५४००-११२४०० (सहाव्या वेतन आयोगानुसार ९३००-३४८००, ग्रेड वेतन ४२००) मधील खालील नमूद कर्मचाऱ्यांची श्रेणी-ब , वेतनश्रेणी S-१४-३८६००-१२२८०० (सहाव्या वेतन आयोगानुसार ९३००-३४८००, ग्रेड वेतन ४३००) मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती करण्यात येत आहे.

श्रेणी-ब मधून श्रेणी-अ मध्ये पदोन्नती

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | सध्या कार्यरत विभाग | सध्या कार्यरत जिल्हा | सध्या कार्यरत नगरपरिषद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रविश लोमेश्वर रामटेके | नागपूर | भंडारा | तुमसर |
| २ | महेश ठकसेन तायडे | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | सिल्लोड |

श्रेणी-क मधून श्रेणी-ब मध्ये पदोन्नती

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | सध्या कार्यरत विभाग | सध्या कार्यरत जिल्हा | सध्या कार्यरत नगरपरिषद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्नेहल अरुण वंजारी | कोकण | रायगड | उरण |
| २ | निलेश मारोतराव नरपाचे | नागपूर | नागपूर | रामटेक |
| ३ | संकेत नरेशचंद्र नंदवंशी | पुणे | पुणे | सासवड |
| ४ | स्वप्नील गंगाधर पीदुरकर | नागपूर | गडचिरोली | चामोर्शी |
| ५ | श्रीकांत दामोदर समर्थ | नागपूर | नागपूर | बहादुरा |
| ६ | अश्विनी गुलाब चवरे | नागपूर | नागपूर | बिडगाव तरोडी |

उपरोक्त पदोन्नती ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. मा सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र २८३०६/२०१७ च्या अधीन राहून सामान्य प्रशासन विभाग (का-१६-ब), शासन निर्णय दि ०७-०५-२०२१ मधील तरतुदींनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा सर्वोच्च न्यायालयाच्या अधीन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील कर्मचाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

३. उपरोक्त पदोन्नत कर्मचाऱ्यांना शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र एसआरव्ही-२०२०/प्रक्र४९/कार्या १२ दि १४-०७-२०२१ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

४. पदोन्नत कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र एसआरव्ही-२०१५/प्र क्र ३०३/कार्या-१२, दि १२-०९-२०१६ व अनुषंगिक शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

५. ज्या ज्येष्ठ कर्मचाऱ्यांची प्रकरणे विचारार्थ खुली ठेवण्यात आलेली आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठतेस बाधा न आणता सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

६. सदर पदोन्नती ही उपरोक्त कर्मचाऱ्यांनी जिल्हा सह आयुक्त, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय, आणि विभागीय आयुक्त कार्यालय, संबंधित विभाग यांच्यामार्फत या संचालनालयाकडे उपलब्ध करून दिलेल्या माहिती व कागदपत्रांच्या आधारे देण्यात आली आहे. सदर कागदपत्रांच्या बाबतीत भविष्यात काही विसंगती आढळल्यास किंवा कागदपत्रे दिशाभूल करणारी आढळल्यास देण्यात आलेली तात्पुरती पदोन्नती तात्काळ रद्द करण्यात येईल.

७. पदोन्नतीने पदस्थापना ही संदर्भ क्र २ वरील अधिसूचनेच्या अनुषंगाने महसुली विभाग वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर देण्यात येईल. पदोन्नतीच्या पदावरील वेतन निश्चिती ही पदोन्नतीने पदस्थापना दिल्यानंतर संबंधित कर्मचारी ज्या नप/नपं मध्ये रुजू होईल त्या दिनांकापासून देय राहील.

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से)
आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

१. विभागीय सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व विभाग.)
२. जिल्हा सह आयुक्त, नगर विकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
३. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)
४. संबंधित कर्मचारी
५. निवड नस्ती.